जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 JUN 2022
पुढारी

# शिवराज्याभिषेक दिन; आज विविध कार्यक्रम

## ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदमध्ये उभारणार 'स्वराज्यगुढी'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवछत्रपतींच्या ३४८ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने मिरवणूक, ब्राह्मण सभा करवीरतर्फे व्याख्यानमाला, तर शिवराज्याभिषेक सोहळा समिती व मराठा तितुका मेळवावा, प्रतिष्ठान कोल्हापूर यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेमध्ये स्वराज्यगुढी उभारण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या कागलकर वाड्याच्या प्रांगणात शिवरायांचा जन्मकाळ ते शिवराज्याभिषेक दिनापर्यंतच्या महत्त्वाच्या घटनांचे दर्शन होणार आहे.

अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने सोमवारी सायंकाळी चार वाजता भव्य मिरवणुकीचे आयोजन केले आहे. मंगळवार पेठेतून मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. ब्राह्मण सभा करवीर, कोल्हापूर यांच्यावतीने मंगलधाम येथे सायंकाळी ६ वाजता, छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन या विषयावर चारुदत्तबुवा आफळे यांचे व्याख्यान



होणार आहे. तर मराठा तितुका मेळवावा, प्रतिष्ठान कोल्हापूर यांच्या वतीने संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिरीष मोरे गुरुजी, इतिहास संशोधन मंडळ पुणेचे बालाजी काशीद, इतिहास अभ्यासक रोहित पेरे-पाटील यांच्या हस्ते सकाळी आठ वाजता पालखी पूजन कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर क्रांतिवीर फिरंगोजी शिंदे मर्दानी आखाडा यांचे शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिक होणार आहे. सकाळी ९ ते १० या वेळेत शिवराज्याभिषेक पूजन आणि दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी चौक आणि निवृत्ती चौक येथील शिवरायांच्या पुतळ्याभोवती आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद येथे सकाळी पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत भगव्या स्वराज्य ध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारून त्यास अभिवादन करून राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीताचे गायन करण्याचे आवाहन शासनाच्या ग्रामविकास विभागाने केले आहे.

### शिवाजी विद्यापीठात विविध कार्यक्रम

शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि. ६) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी १०.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन होईल. त्यानंतर छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र येथे गडकिल्ले चित्र प्रदर्शनाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते उद्घाटन होणार आहे. सकाळी ११.३० वाजता स्वराज्यातील गडकिल्ल्यांवरील माहितीपट (किल्ले जिंजी) दाखविला जाईल. दुपारी १२ वाजता ऐतिहासिक मराठी चित्रपट 'गनिमी कावा' दाखविण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात शहाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांचे 'पन्हाळगडचा इतिहास' या विषयावर व्याख्यान होईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. डी.टी. शिर्के यांची उपस्थिती असेल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

पुढारी

# प्रभारी संचालकपदी डॉ. धनंजय सुतार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ.धनंजय सुतार यांची तर ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या प्रमुखपदी डॉ. सचिन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. ज्ञानस्रोत केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे स्वागत केले.

डॉ. सुतार यांनी १४ वर्षे महाविद्यालयीन ग्रंथपाल, २ वर्षे सहाय्यक ग्रंथपाल, ७ वर्षे उप-ग्रंथपाल काम केले आहे. त्याचप्रमाणे त्यांना २२ वर्षांहून अधिक काळ अध्यापनाचा अनुभव आहे. दर्जेदार संशोधन, लेखक व विद्यार्थीप्रिय उप-ग्रंथपाल असा त्यांचा लौकिक आहे.

ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या प्रभारी प्रमुखपदी डॉ. पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. संशोधन वृत्ती, विद्याव्यासंग आणि अध्यापन कुशलतेमुळे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी परिचय करून दिला. सहाय्यक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षा पावसाळ्यात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने मार्च, एप्रिल २०२२ च्या उन्हाळी सत्रात घ्यावयाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा जूनच्या पहिल्या पंधरावड्यानंतर सुरू होणार असून त्या सप्टेंबर अखेरपर्यंत चालणार आहेत. दीर्घकाळ चालणाऱ्या या परीक्षांचा फटका अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना बसणार आहे. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा जूनच्या पंधरावड्यानंतरच सुरू होणार आहेत. या परीक्षा सप्टेंबर २०२२ मध्ये संपणार आहेत. त्यामुळे पुढील शैक्षणिक सत्राचे नियोजन करताना शिवाजी विद्यापीठाला तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

Times of India

# Shivaji varsity summer semester exams set to begin on June 25

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The summer semester examination of Shivaji University, Kolhapur (SUK) will begin from June 25 and all the exams will be held in offline format where the students will have to write descriptive answers.

The university authorities maintained that only the starting date of the exams have been fixed and no objective question papers will be set for any exam. "Entire schedule will be released soon," a university official said. "Exams for the first and second year graduation students will be held at the initial stages, while those for the post-graduate students will be held in the last week of July," the official added.

The university has once again cleared that the exams will be held offline and students will have to attend the designated exam centres. For some courses, two papers will be held on the same day. Also, a gap of two days will be their between two exams.

**Change in entrance exam timetable for MSc courses**

The SUK has changed the time table for the entrance exams to be conducted for the MSc courses. Earlier, the exams were scheduled to be held between June 10 and 12. Now it will be held between June 10 and 13. The last date for the application was May 31. The hall tickets have been made available on SUK's website and are ready to be downloaded.

सकाळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रात डॉ. धनंजय सुतार, डॉ. सचिन पाटील यांचे स्वागत झाले.**

# डॉ. सुतार, डॉ. पाटील यांचे स्वागत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ. धनंजय सुतार यांची तर ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या प्रमुखपदी डॉ. सचिन पाटील यांची नियुक्ती झाली आहे. त्यांचे केंद्रात नुकतेच स्वागत झाले. अध्यक्षस्थानी डॉ. युवराज जाधव होते. डॉ. धनंजय सुतार यांनी १४ वर्षे महाविद्यालयीन ग्रंथपाल, २ वर्षे सहाय्यक ग्रंथपाल, ७ वर्षे उप-ग्रंथपाल म्हणून काम केले आहे. त्याचप्रमाणे त्यांना २२ वर्षांहून अधिक काळ अध्यापनाचा अनुभव आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या प्रभारी प्रमुखपदी डॉ. सचिन पाटील यांची नियुक्ती झाली आहे. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे. दरम्यान, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी परिचय करून दिला. सहाय्यक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात यांनी आभार मानले.